| | |
|---|---|
| | **निशाणी क्रमांक ०५ वरील आदेश (दिनांक १२.०२.२०२४)** |

वादी/अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी/गैरअर्जदाराचे विरुद्ध तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळणेकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश ३९ नियम १ व २ अन्वये सादर केलेला आहे. त्यास प्रतिवादींनी नि.क्र. ३४ वर आपला जबाब देऊन हरकत घेतली आहे.

**अर्जदाराची हकीकत थोडक्यात खालीप्रमाणे –**

**०२.** दावा हा प्रथम वादी शिनाबाई राजन्ना बोटेवाड यांनी त्यांचा मुख्त्यार तथा मुलगा शिवाजी बोटेवाड यांच्या मार्फत दाखल केला. परंतु दावा दाखल झाल्यानंतर वादी शिनाबाईचा मृत्यु झाला आणि तदनंतर मयत वादीचे वादी क्र.०१/०१ ते ०१/०७ असे वारस अभिलेखावर दाव्यात घेण्यात आले.

**०३.** अर्जदाराची हकीकत थोडक्यात अशी आहे की, वादी ही मौजे कोसमेट, ता. किनवट येथील रहीवाशी आहे. हुशप्पा बंकाराम बंकलवाड हे वादीचे वडील होते. तर प्रतिवादी क्र.०१ ही वादीची बहीण आहे. प्रतिवादी क्र.०२ ही वादीची भावजयी आहे. प्रतिवादी क्र.०३ हा वादी यांचा भाचा आहे. प्रतिवादी क्र. ०४ व ०५ ही वादीच्या भावाच्या मुली आहेत. हुशप्पा बंकाराम बंकलवाड यांना एकूण चार अपत्ये होती. त्यापैकी एक मुलगी व एक मुलगा मयत झाले. मयत मुलीला कोणीही वारस नव्हते. त्याचप्रमाणे हुशप्पा बंकाराम बंकलवाड याची पत्नी सुध्दा मरण पावली आहे.

**०४.** मयत हुशप्पा बंकाराम बंकलवाड याच्या हयातीत मौजे कोसमेट येथील गट क्र. १४३ मध्ये १ हे ७० आर जमीन, गट क्र.१४२ मध्ये अनुक्रमे ० हे ६५ आर, ० हे ६५ आर आणि ० हे ३५ आर, गट क्र.१७० मध्ये अनुक्रमे ० हे ४२ आर, ० हे ८० आर आणि ० हे ८० आर, गट क्र.१७१ मध्ये अनुक्रमे १ हे ६० आर आणि १ हे ६० आर जमीन त्यांच्या होत्या. (सबंधीत मिळकतींना यापुढे संक्षेपाकरीता एकत्रीतरित्या 'वाद मिळकती' संबोधले आहे.) त्यामुळे वाद जमीनी हया वडीलोपार्जीत जमीनी आहेत. वादीचे वडील मयत हुशप्पा यांनी त्यांच्या हयातीत वाद मिळकतीचा समसमान हिस्सा व ताबा देण्याचे अभिवचन दिले परंतु आज देवू उदया देवू असे करीत ते मयत झाले.

**०५.** वादीच्या वडीलाच्या मृत्युनंतर वादीच्या भावाने वादीस वाद मिळकतीत हिस्सा आणि ताबा देण्याचे मान्य केले होते परंतु त्याने कौटुंबीक व्यवस्थापनेसाठी स्वतःची पत्नी व मुली व मुलाच्या

नावे वाद मिळकत नोंदवून घेतले. वादीची मयत बहीण भागाबाई हिस कोणतेही वारस नसल्याने तिच्या नावे असलेली गट क्र.१४२ मधील जमीन वादीच्या भावाने प्रतिवादी क्र. ४ आणि ५ च्या नावे बनावटी दानपत्रा आधारे करुन दिली.

**०६.** वादीने प्रतिवादीकडे वारंवार तिच्या हिस्याची मागणी केली. तसेच दिनांक २६.१०.२०२२ रोजी भाऊबीज सणानिमीत्य वादी हिने माहेरी जाऊन प्रतिवादींना तिचा हिस्सा मागीतला. परंतु प्रतिवादींनी तो नाकारला उलट वाद मिळकत विक्री करण्याची धमकी दिली. म्हणून वादीने दाव्याचा निकाल लागेपर्यंत किंवा दावा प्रलंबित असे पर्यंत प्रतिवादीविरूद्ध त्यांनी प्रतिवादींनी वाद मिळकतीमध्ये कोणताही बदल करु नये, कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीचे हक्क सबंध निर्माण करु नये अथवा विक्री करु नये म्हणून तात्पुरता मनाईहुकुम मागितला आहे.

**<u>गैरअर्जदाराची हकीकत थोडक्यात खालीप्रमाणे –</u>**

**०७.** प्रतिवादींनी हजर होऊन नि.क्र.३४ वर जवाब दाखल केला. सदरचा जवाब नि.क्र.३५ वरील पुरशिस नुसार प्रस्तुत अर्जाचे म्हणणे गृहीत धरण्यात आले. प्रतिवादींनी अर्जातील कथने नाकारली आहेत. प्रतिवादींच्या मते वाद मिळकत ही वडीलोपार्जीत मिळकत नाही. वादीचे वडील वाद मिळकतीचे मालक नव्हते. वादीचे वडील हुशप्पा हे सन १९५० च्या पूर्वी मयत झाले आहे. वादीचा मुलगा शिवाजी याने कोसमेट ग्रामपंचायतीशी हात मिळवणी करुन मयत हुशप्पा बंकलवाड यांचा खोटा मृत्यु दाखला तयार केला आणि त्या आधारे खोटा दावा दाखल केला. वादीला वाटणी मागण्याचा कोणताही अधिकार नाही. त्यामुळे प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**०८.** अर्जदाराच्या वतीने अर्जदाराचे विधीज्ञ एस.व्ही.हाटकर यांचा तर गैरअर्जदाराच्या वतीने गैरअर्जदाराचे विधीज्ञ डि.जी.काळे यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. उभयतांच्या कथनाचा व युक्तिवादाचा विचार करता खालील वाद प्रश्न निर्माण होत असून त्यावरील निष्कर्ष पुढीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१ | अर्जदाराची अथवा वादीची सकृतदर्शनी केस असल्याचे त्यांनी केले आहे काय ? | .........नाही. |
| ०२ | न्यायाचा समतोल अर्जदाराचे लाभात असल्याचे त्यांनी शाबीत केले आहे काय ? | .........नाही. |

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०३ | तुर्तातत्तूर्त मनाई हुकुम न दिल्यास वादींचे अथवा अर्जदाराचे अपरिमित नुकसान होणार असल्याचे त्यांनी शाबित केले आहे काय ? | .........नाही. |
| ०४ | आदेश काय ? | अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. |

**<u>वाद्र प्रश्न क्र. १ ते ३ करिता</u> –**

**०९.** वाद प्रश्न क्र. १ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे त्यांची चर्चा एकत्र करण्यात येते.

**१०.** वादीच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, वाद मिळकती हया वडीलोपार्जीत मिळकत आहेत. त्या जर विक्री झाल्या तर वादीचे अपरीमीत नुकसान होवू शकते. वादीच्या विधीज्ञांनी ***<u>मा. सर्वोच्य न्यायालयाचा न्यायनिर्णय दलपत कुमार आणि इतर वि. प्रल्हादसिंग आणि इतर, दिनांक १६.१२.१९९१</u>*** चा संदर्भ दिला आहे. ज्यामध्ये मा. सर्वोच्य न्यायालयाने परीच्छेद क्रमांक ०४ मध्ये असे म्हटले आहे की, मनाईहुकुमाचा अनुतोष हा एक विवेकाधिन अनुतोष आहे, जो देते वेळेस न्यायालयाने पक्षकाराने दाव्यामध्ये उपस्थीत केलेला प्रश्न हा गंभीर स्वरुपाचा आहे, ज्यामध्ये पक्षकाराने मागीतलेला अनुतोष किंवा उपाययोजना वस्तुस्थितीवर शक्य वाटतात का आणि सबंधीत उपस्थीत केलेला प्रश्न हा वादी किंवा प्रतिवादीच्या हक्कात शक्य आहे का हे पाहणे आवश्यक आहे. त्याच बरोबर पक्षकाराचे अपरीमीत नुकसान टाळण्यासाठी सबंधीत आदेश करणे आवश्यक आहे काय आणि मनाईहुकुमाचा अनुतोष नाकारला किंवा देणे टाळले तर पक्षकारास तुलनात्मक त्रास किंवा गैरसोय होऊ शकते हे पाहणे गरजेचे आहे.

**११.** त्याच बरोबर वादीच्या विधीज्ञांनी ***<u>मा. पंजाब–हरयाणा उच्च न्यायालयाचा प्रकाशसिंग वि. हरयाणा सरकार</u>*** , दिनांक १५ जानेवारी,२००२ या न्यायनिर्णयाचा देखील आधार घेतला. ज्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने निष्कर्ष नोंदविला आहे की, प्रथमदर्शनी केस याचा अर्थ असा नव्हे की, वादीकडे शतप्रतिशत प्रकरण असावे आणि तो सर्व संभाव्यावरुन खटल्यात यशस्वी होईल किंबहुणा प्रथमदर्शनी केस म्हणजे वाद प्रश्नांचा विचार करता तो सर्वसकट फेटाळला जाण्यास जबाबदार नाही, न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने असणे आवश्यक आहे. वाद मिळकत वादीच्या ताब्यात आहे. मनाईहुकुमाच्या आदेशाने आणखी काही काळ वादग्रस्त संपत्ती त्याच्या ताब्यात राहीली तर सर्वकाही नुकसान होणार नाही. परंतु त्याचा ताबा काढून घेतला तर त्याचे भरुन न

होणारे नुकसान होईल आणि तो रस्त्यावर येईल.

**१२.** वर नमुद मा. सर्वाच्य न्यायालय आणि मा. उच्च न्यायालय यांनी मार्गदर्शीत केल्याप्रमाणे दाव्यामध्ये उपस्थीत केलेला प्रश्न सद्यस्थीतीला शक्य वाटतो का? अर्जदाराने उपस्थित केलेला प्रश्न हा प्रथमदर्शनी योग्य व वादीच्या हक्कात आहे का? हे पाहणे महत्वाचे आहे. त्याचबरोबर तात्पूरता मनाई हुकुमाचा अर्ज निकाली काढतेवेळेस न्यायाचा समतोल अर्जदाराच्या बाजूने आहे का ? व अर्ज नाकारला गेल्यास कोणत्या पक्षाचे अपरिमित नुकसान होईल हे पाहणे गरजेचे ठरते.

**१३.** अभिलेखावरील वादीच्या कैफियतीवरुन असे दिसून येते की, दावा हा प्रथम वादी शिनाबाई राजन्ना बोटेवाड यांनी त्यांचा मुख्त्यार तथा मुलगा शिवाजी बोटेवाड यांच्या मार्फत दाखल केला. परंतु दावा दाखल झाल्यानंतर वादी शिनाबाईचा मृत्यु झाला आणि तदनंतर मयत वादीचे वादी क्र.०१/०१ ते ०१/०७ असे वारस अभिलेखावर दाव्यात घेण्यात आले परंतु त्या संदर्भातील कोणतीही दुरुस्ती प्रस्तुत तात्पुरत्या मनाईहुकमाच्या अर्जामध्ये करण्यात आलेली नाही.

**१४.** अर्जदाराने कथन केले आहे की, वाद मिळकत ही वडीलोपार्जीत मिळकत आहे. ज्यामध्ये वादीचा अविभक्त हिस्सा आहे. सबंधीत बाब प्रतिवादीं मार्फत नाकारण्यात आली आहे. वाद मिळकत ही वडीलोपार्जीत मिळकत आहे की स्वकष्टार्जीत मिळकत आहे याचे उत्तर सद्यस्थितीला देणे योग्य ठरणार नाही. असे असले तरी वाद मिळकत पूर्वी वादीच्या वडीलाच्या नावे होती का आणि वादीचे वडील नामे हुशाप्पा बंकलवाड यांच्या मृत्युनंतर वाद मिळकत वादीच्या भावाच्या नावे झाली का हे तथ्य प्रथमदर्शनी वादीने स्थापीत करणे आवश्यक आहे.

**१५.** वादीने नि.क्र.०४ सोबत मौजे कोसमेट येथील गट क्र.१४२ चा सातबारा उतारा दाखल केला आहे, ज्यावरुन सबंधीत गटातील ० हे ६५ आर क्षेत्र प्रतिवादी क्र.०४ आणि ०५ च्या नावे प्रत्येकी असल्याचे दिसून येते. नि.क्र.०४ सोबत जोडलेल्या सातबारा उतारा गट क्र.१७० वरुन सद्यस्थीतीला सबंधीत गटात प्रतिवादी क्र.०४ व ०५ च्या नावे जमीन असलेली दिसून येते. गट क्र. १७१ च्या सातबारावरुन सबंधीत गटामध्ये प्रतिवादी क्र.०२ व ०३ च्या नावे जमीन असल्याचे दिसून येते. गट क्र.१४३ च्या सातबारा उतारावरुन सबंधीत गटामध्ये प्रतिवादी क्र.०२ च्या नावे जमीन असल्याचे दिसून येते. तर गट क्र.१७० च्या सातबारावरुन प्रतिवादी क्र.०२, ०४ आणि ०५ च्या नावे जमीन असल्याचे दिसून येते.

**१६.** वादीच्या मते वाद मिळकती हया वडीलोपार्जीत मिळकती आहेत. सबंधीत वाद मिळकती या वादीच्या वडीलांच्या मृत्युनंतर प्रतिवादींच्या नावे फेरफार झाल्याचा उल्लेख देखील वादीने

केला आहे परंतु सबंधीत जमीनी प्रतिवादींच्या नावे कोणत्या वर्षी आणि कोणत्या फेरफार आधारे झाला या संदर्भातील दस्तावेज वादीने अभिलेखावर दाखल केला नाही.

**१७.** वादीने दाखल केलेल्या दस्तावेजावरुन वादीचे वडील नामे हुशप्पा बकंलवाड हे सन १९५८ मध्ये मयत झाले होते तर प्रतिवादीच्या मते वादीचे वडील सन १९५० मध्ये मयत झाले आहे. जरी वादीचे तिच्या वडीलाच्या मृत्यु संदर्भातील कथन गृहीत धरले तरी तिच्या वडीलाचा मृत्यु साधारणपणे ६० वर्षापूर्वी झाल्याचे दिसून येते त्यामुळे तेव्हापासून आजतागायत वाद मिळकत अविभक्त आहे हे दर्शविण्यासाठी सद्यस्थितीला वादीने कोणतेही कागदपत्रे दाखल केले नाही. वादीने वाद मिळकती प्रतिवादीच्या वडीलांच्या नावे केव्हा झाल्या याबद्दल कोणतेही कागदपत्रे अभिलेखावर दाखल केले नाही. महत्वाचे म्हणजे वादीने वाद मिळकती सन १९५८ मध्ये प्रतिवादीच्या वडीलांच्या नावे आल्या का तसेच कोणत्या दस्तावेजाद्वारे झाले किंवा तदनंतर प्रतिवादींच्या नावे झाल्या या संदर्भातील दस्तावेज सद्यस्थितीला सादर केले नाही. त्यामुळे सद्यस्थितीला वाद मिळकती पूर्वी तिच्या वडीलाच्या नावे होती हे तथ्य प्रथमदर्शनी स्थापीत होत नाही.

**१८.** अभिलेखावरील सातबार उता–यावरुन मौजे कोसमेट येथील गट क्र. १४३ मध्ये १ हे ७० आर जमीन, गट क्र.१४२ मध्ये अनुक्रमे ० हे ६५ आर, ० हे ६५ आर आणि ० हे ३५ आर, गट क्र.१७० मध्ये अनुक्रमे ० हे ४२ आर, ० हे ८० आर आणि ० हे ८० आर, गट क्र.१७१ मध्ये अनुक्रमे १ हे ६० आर आणि १ हे ६० आर जमीन या प्रतिवादींच्या नावे असल्याचे दिसून येतात. त्या केव्हा आणि कोणत्या फेरफार अथवा मालकी दस्तावेजाद्वारे प्रतिवादीच्या नावे झाल्या याबद्दलचे तथ्य वादीने न्यायालयापासून लपवून ठेवलेले आहे. तसेच वादीने सबंधीत वाद मिळकतीच्या कोणत्याही प्रकारच्या चर्तुसिमा दाव्यात नमुद केल्या नाहीत. वाद मिळकतीमध्ये एका स्वतंत्र गट क्रमांकाच्या शेतीमध्ये वादीने वेगवेगळया प्रतिवादीच्या नावे असलेल्या वेगवेगळया भुखंडाचा समावेश केला आहे. त्यामुळे सबंधीत स्वतंत्र भुखंडाच्या चर्तुसिमा हे महत्वाचे तथ्य वादीने न्यायालयापासून लपवल्याचे दिसून येते. त्यामुळे वादी स्वच्छ हाताने न्यायालयात आल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही.

**१९.** वादीने नि.क्र.२० सोबत बांधकामाच्या संदर्भात छायाचित्र दाखल केले आहे. परंतु सदरील छायाचित्र कोणत्या जमीनीवर आहेत या संदर्भातील कोणतेही स्पष्टीकरण अभिलेखावर दाखल केले नाही.

**२०.** वादी मार्फत नि.क्र.४१ वर फेरफार क्रमांक १०९ ची प्रत दाखल केली आहे, ज्यामध्ये

प्रतिवादींचे वडील रामा यांनी गट क्र.१४३ मधील जमीन इंदिराबाईच्या नावे करुन दिल्याचे दिसून येते. तसेच वादीने फेरफार क्र.११० आणि १११ ची प्रत देखील नि.क्र.४१ वर दाखल केली आहे. अभिलेखावरील फेरफार क्र.१०९, ११० व १११ मध्ये वादीच्या वडीलाकडून जमीन आल्याचा उल्लेख नाही. त्यामुळे वादीने आणलेली कैफीयत प्रथमदर्शनी संदीग्ध स्वरुपाची दिसून येते.

**२१.** वादीच्या अर्जावरुन वादीने वाद मिळकती संदर्भात बरेचशे दस्तावेज लपवून ठेवल्याचे दिसून येते. वादी स्वच्छ हाताने न्यायालयासमोर आल्याचे दिसून येत नाही. त्याचप्रमाणे वादी मागीतल्याप्रमाणे मनाईहुकुम मिळण्यास पात्र नाही. दाव्याचा काल सद्यस्थीतीला वादीच्या हक्कात असल्याचे दिसत नाही. वादीची कैफियत जरी ग्राहय धरली तरी सन १९५८ पासून वादग्रस्त मिळकत ही प्रतिवादींच्या ताब्यात असल्याचा अंदाज काढता येतो. त्यामुळे आज रोजी वाद मिळकतीवर कोणतेही बांधकाम झाले तर वादीचे फारसे नुकसान होणार नाही. त्याच बरोबर वादीने, प्रतिवादी हे वाद मिळकत हे त्रयस्थ व्यक्तीला विक्री करण्याच्या प्रयत्नात आहे असे म्हटले आहे. प्रस्तुतचा दावा हा दिनांक ०३.०३.२०२३ रोजी दाखल झालेला आहे. अद्याप वादीने वाद मिळकत कोणत्याही व्यक्तीस विक्री करीत आहे किंवा कोणत्या प्रकारे हस्तांतर करीत आहे या सबंधात कोणतेही स्पष्टीकरण दिले नाही. त्यामुळे जरी प्रस्तुत अर्ज नामंजूर झाला तरी कोणतेही अपरीमीत नुकसान होताना आढळून येत नाही. त्यामुळे वर नमुद मा. सर्वोच्य आणि मा. उच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय हा अर्जदारास मदत करणारा ठरत नाही.

**२२.** महत्वाचे म्हणजे अभिलेखावर दाखल केलेले महसूल उतारे व महसूल नोंदीवरुन वाद मिळकती हया प्रतिवादीच्या नावे आणि ताब्यात असल्याचे आढळून येते. वादीने जरी वाद मिळकती हया प्रतिवादीने त्रयस्थ व्यक्तीला विक्री करु नये असा अनुतोष मागीतला असला तरी तो मंजूर झाल्यास, त्या आधारे वाद मिळकतीवरुन प्रतिवादीला बेदखल करण्याचा प्रयत्न होवू शकतो त्यामुळे प्रतिवादीचे न भरुन येणारे नुकसान होऊ शकते. म्हणून मी मुद्दा क्रमांक ०१ ते ०३ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**वाद प्रश्न क्र. ४ करिता –**

**२३.** वरील निष्कर्षाप्रमाणे सकृतदर्शनी केस (prima–facie), न्यायाचा समतोल (Balance of Convenience) आणि अपरिमित नुकसान (Irreparable Injury) या तिन्ही सज्ञा केवळ अलंकारिक भाषेचा नमुना नसून तिन्ही सज्ञांना विशिष्ट महत्त्व आहे. प्रस्तूत प्रकरणामध्ये सदर तिन्ही सज्ञा वादींच्या लाभात असल्याचे वादी / अर्जदारास अपयश आले आहे. म्हणून वादी

मागीतल्याप्रमाणे तात्पुरत्या मनाईहुकुमाचा अनुतोष मिळण्यास पात्र नाही त्यामुळे मी मुद्दा क्र. ४ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**–आ दे श–**

०१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

०२. अर्जाचा खर्च वादीने सोसावा.

स्वाक्षरी/–

दिनांक : १२.०२.२०२४.

( एस. बी. अंभोरे)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, किनवट

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Chitmalwar S.M. |
| Court Name | : | Court of C.J.J.D., Kinwat |
| Date | : | 12/02/2024 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 12/02/2024 |
| Order uploaded on | : | 13/02/2024 |

XXXX